# केम्ब्रिज विद्यापीठात शोधकार्याचा निर्मितीत यशस्वी वापर : प्रा. फ्रेंड

▸ प्रतिनिधी

पुणे, दि. १८ : विद्यापीठ व प्रयोगशाळांनी विकास आणि संशोधनात पुढाकार घेऊन शोधकार्याचा निर्मितीप्रक्रियेत वापर करावा. अशा प्रकारचे काम केम्ब्रिज विद्यापीठाने यशस्वीरीत्या केले असल्याची माहिती ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ प्रा. सर रिचर्ड फ्रेंड यांनी आज येथे दिली.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील (एनसीएल) इन्होव्हेशन पार्क आणि व्हेंचर सेंटरतर्फे आयोजित 'इन्होव्हेशन टेकनॉलॉजी एंटरप्रायजेस' व्याख्यानमालेतील उद्घाटनपर व्याख्यानात ते बोलत होते. 'केम्ब्रिजमध्ये कंपनीची सुरुवात - विज्ञाकडून तंत्रज्ञान व निर्मितीकडे' या विषयावर प्रा. फ्रेंड यांनी व्याख्यान दिले व केम्ब्रिज विद्यापीठातील शोधकार्याद्वारे त्याचे पेटंट करून निर्मितीच्या प्रवासाची माहिती त्यांनी दिली.

या वेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रयोगशाळेचे संचालक डॉ. शिवराम, डॉ. व्ही. प्रेमनाथ आदी उपस्थित होते.

प्रा. फ्रेंड म्हणाले, "केम्ब्रिजमध्ये व आजूबाजूला ९०० उच्चतंत्रज्ञ कंपन्या आहेत. या सर्व तंत्रज्ञानाच्या व सल्ला सेवा संस्थेच्या विकासावर विकसित होत असतात. सन १९८९मध्ये केम्ब्रिज विद्यापीठात एका प्रयोगाद्वारे शोध लावण्यात आला. 'पॉलिमर्स'ला इलेक्ट्रिक चार्ज देऊन प्रकाशमान करता येऊ शकते, असा तो शोध होता. या प्रयोगाचे अनेक वापर होते. या प्रयोगाची व्यावसायिक क्षमता ओळखून तिचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला."

शोधकार्याबाबत आमच्यासमोर दोन पर्याय होते. मोठी कंपनी शोधून त्यांना पेटंट विकणे किंवा आपण स्वतःच पेटंट घेऊन निर्मिती करायची. या दोन पर्यायांपैकी स्वतःच पेटंट करणे हा पर्याय निवडून १९९४मध्ये कंपनी स्थापन करून निर्मिती सुरू केली. केम्ब्रिज डिस्प्ले टेक्नॉलॉजी कंपनीद्वारे अशा बऱ्याच प्रयोगांचे रूपांतर निर्मितीत होऊ लागले. त्यानंतर अशाच प्रकारे 'प्लॅस्टिक (पान ३ वर)